शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय।
दिनांक:- 8 AUG 1990

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
हडपसर पुणे-२८

विषय:- १९९०.९१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत......

संदर्भ:- शासन पत्र क्र. एसएसएन-१०९०/२२६५/माशि -१
दिनांक:- १३.७.९०

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून खालील दर्शविलेल्या ठिकाणी माध्यमातून विना अनुदान तत्वावर/~~कायम विना अनुदान~~ तत्वावर " विशेष बाब" म्हणून जून १९९० पासून नविन माध्यमिक शाळा सुरू करण्यास, अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

विशेष अटी:-

अ] या नविन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन-१०८८/१६६७एन/ माशि-१ दि. १०. २. ८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही वा आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ.बी.सी. च्या ] फीच्या परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करून ठेवावे.

इतर अटी:-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणी आवश्यक आहे.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

हया बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असली तरी दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजले जाईल.

| अ.नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर पुणे-२८ | महंमदवाडी तरवडेवस्ती ता. हवेली | आठवी | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियम ३.१. नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करावा. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम २८ मधील १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे मुद्रीत व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रतिलिपी:- शिक्षणाधिकारी [माध्य.] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषीत....

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-याकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रतिलिपी:- मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग मंत्रालय, विस्तार भावन मुंबई-३२ यांना त्याचे वरील संदर्भाकिय पत्रान्वये माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी:- मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना माहितीसाठी सादर....

जा. क्र. माद्यप३[१४]नुतनीकरण/पुवि-९२
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग
पुणे-१याँचे कार्यालय
दिनांक :- १|८|९२

प्रति,
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
हडपसर पुणे-२८.

विषय :- १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांच्या आदेशाचे नुतनीकरण करुन १९९२-९३ पासून परवानगी देण्याबाबत...

संदर्भ :- शासन पत्र क्र. एसएसएन १३९२/ २०६१/माशि-१ शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक ३०-६-९२.

वरील संदर्भीय शासन आदेशान्वये ज्या माध्यमिक शाळांना सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्यात आलेली होती. त्या शाळांना परवानगी मिळाल्याचे आदेश संबंधीतसंस्थेला उशीरा मिळाल्याने विद्यार्थी संख्येअभावी व इतर अपरिहार्य कारणामुळे त्यावर्षी शाळा सुरु करता आली नाही. याबाबत आपल्या संस्थेने केलेली विनंती विचारात घेऊन जून १९९० ऐवजी जून १९९२ पासून संबंधीत ठिकाणी शाळा सुरु करण्यास "खास बाब" म्हणून नेहमीच्या अटींची तसेच परवानगी पत्रातील अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] संस्थेचे नांव :- महाराष्ट्र आरोग्य मंडळ हडपसर पुणे-२८.
२] शाळेचे नाव:- माध्यमिक विद्यालय महंमदवाडी, पुणे.
३] परवानगी द्यावयाच्या वर्ग:- ८ वी
४] माध्यम :- मराठी.
५] पूर्वी ज्या शासन पत्राने परवानगी दिली होती त्या शासन पत्राचा क्रमांक :- एसएसएन १०९०/२२६५/माशि-१ दि. १३-७-१९९०.

अटी:-

१] सदर संस्थेने ३१ जुलै १९९२ पर्यंत वरिल ठिकाणी माध्य. शाळा सुरु न केल्यास त्यांना दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
२] सदर संस्थेने शाळा सुरु केल्यापासून १० दिवसात शिक्षणाधिकारी [माध्य] यांच्या मार्फत शाळा सुरु केल्याबाबतचा लेखी अहवाल या या कार्यालयास सादर करावा.
३] सदर परवानगी पत्रातील अटींची पुर्तता संस्था करीत असल्याचा अहवाल शिक्षणाधिकारी [माध्य] यांचे मार्फत सादर करण्यात यावा.

स्वाक्षरीवरं शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:- शिक्षणाधिकारी [माध्य] जिल्हा परिषद, पुणे-११ यांना कळविण्यात येते की, त्यांनी शाळेची त्वरीत तपासणी करुन तपासणी अहवालासह पुर्तता अहवाल या कार्यालयास पाठवावा.
२/- कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२.

८०५
३१८१९२